प्र क र ण

# रामदासांची शिकवण आणि शैली

## ' रामदासांची शिकवण आणि शैली'

### रामदासांची शिकवण

समर्थ रामदासांच्या मनोबोधाची शिकवण इतकी उत्कृष्ट आहे की त्याची तुलानाच होणे शक्य नाही. तीनशे वर्ष होवूनही त्याची गोडी अविट आणि रुची ताजी आहे. आबालवृद्ध स्त्री पुरुषांना सारखी शिकवण देणारे असे हे मनाचे श्लोक म्हणजे समर्थांच्या वाड्.मय. निर्मितीचा सर्वांगसुंदर फुलोराच आहे. आजही महाराष्ट्रातील बहुतेक घरातून हे मनाचे श्लोक लहान मुलांकडून नित्यनेमाने म्हणून घेतले जातात. का तर त्यांच्या बालमनावर समर्थांच्या शिकवणूकीचे चांगले संस्कार व्हावेत व त्यांची मने प्रगल्भ व्हावीत. लोकांना भक्तीमार्गाच्या सुगम पंथाने उर्ध्वगतीला नेऊन ते अंतिम मोक्षाचा दरवाजा खुला करुन देतात. बद्धांना सिद्धावस्थेपर्यंत पोहचविण्याचे सामर्थ्य या छोटया वाटणा-या मनाच्या श्लोकांत आहे.[1] रामनामाची महती गाऊन ते माणसाला कसे तारक आहेत ह्याची शिकवण समर्थांनी या श्लोकांत दिली आहे. परमेश्वर हा भक्ताभिमानी कसा आहे, तो आपल्या भक्तांची उपेक्षा कधीही करणार नाही. असा विश्वास हे श्लोक म्हणणा-यांच्या मनात निर्माण होतो. रामदास म्हणतात की, "नुसता वितंडवाद घालत न बसता प्रत्येकाने सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करावा. आपल्या बोलण्यात व वागण्यात विसंगती येऊ देऊ नये. कारण ही वागण्याची पद्धत दुर्जनांना शोभणारी आहे".

खरा देव कोण ? याचे मार्मिक असे स्पष्टीकरण समर्थ रामदासांनी मनाच्या श्लोकांत अगदी यथार्थ पणे केले आहे. ख-या देवाचा शोध घेता घेता माणूस स्वतःच देव कसा बनतो याची साक्ष समर्थांनी या श्लोकांतून पटवून दिली आहे. म्हणूनच सर्वसामान्य माणसांना या श्लोकांतून नीतीतत्वाची व अध्यात्माची शिकवण सहजच मिळते. प्रबोधनाद्वारे समाजाचे उस्थापन करण्याचे ध्येय या श्लोकामुळे सहज शक्य होते. बहुजन समाजाला शिकवून शहाणे करण्यासाठी त्यांनी मनोबोधाची रचना केली असावी. माणसाला जर उपदेश केला तर तो त्याला पटतोच असे नाही. म्हणून समर्थांनी माणसांना उपदेश न करता आपल्या मनाला उपदेश केला. हा उपदेश वाचणा-यांच्या म्नाला आपोआपच होतो. समर्थांना मनालाच उपदेश करावा असे वाटण्याचे कारण म्हणजे माणूस म्हणजे मनच ! माणसातून मन वजा करता माणूस हा नुसता लाकडाचा ठोकळाच उरतो. मन संपूर्ण शरीराला ताब्यात ठेवते. मनाच्या सहाय्याने संपूर्ण शरीर काम करत असते. सगळया इंद्रियाचा राजा असे हे मन असते. मन हेच इंद्रियाच्या माध्यमाने सर्व विषयांचा भोग घेत असते. सगळया सुखदुःखाला कारण हे मनच होय. जोपर्यंत मनाला जाणीव होत नाही. म्हणूनच समर्थांनी मनाला बोध केला आहे. म्हणजेच समर्थांनी मनाच्या श्लोकांतून सर्वसामान्य जनतेला शिकवण दिली आहे.

'श्रीराम' हे सर्वस्व कल्पून रामदासांनी मनाला दिलेली शिकवण म्हणजे श्रीराम हा सुखाचा सागर आहे. त्या श्रीरामाचे ठायी श्रद्धायुक्त अंतःकरणाने त्याकडे लक्ष ठेवावे. मनात निर्माण होणारे विकल्प बाजूला सारुन त्या ठिकाणी त्या राघवाचे रुप ठसवावे म्हणजे सुखाचा मार्ग सुकर होईल. हाच ख-या सुखाचा एकमेव मार्ग आहे हे तत्व त्या श्लोकांच्या सतत वाचनाने व मननाने माणसाला पटायला लागले. व सर्व गुणांनी-युक्त असा माणूस निर्माण होऊ लागतो जर माणसाने त्या श्रीहरिला सतत समोर बघीतले, त्यासी भक्ती केली, त्याच्याच कार्यात आपला देह झिजविला, सतत बोलताना त्याच्याच जप केला, धर्माचारण केले, बोलल्याप्रमाणे वागले, अंतःकरण अतीशय शुध्द ठेवल , स्वार्थ बुध्दीचा त्याग केला, सदैव नम्रपणाने वर्तन केले, वितंडवाद न करता जर आपण कोण? कुठून आलो? या जगाची उत्पती कशी झाली याचाच जर सदैव विचार केला, नेहमी खरे बोलले आणि कल्पनेच्या पाठीमागे न लागता परमेश्वरावर दृढ श्रद्धा ठेवली तर तो स्नेहाळू, कृपाळू व दयाळू अशा सर्व गुणांचा समुच्चय तुझ्यात होईल अशी रामदासांनी उत्तम पुरूष बनण्यासाठी शिकवण दिली आहे.

सकाळच्या वेळी रामनाम घ्यावे. सतत रामचेचचिंतन करावे. तो राम लावण्यारूपी, पूर्णप्रतापी आणि भक्ताला संकटातून तारणारा असा आहे. त्या रामापुढे यायला महाक्रुर असा काळ ही घाबरतो. अशा श्रीरामाचे प्रभातकाळी स्मरण करावे प्रत्यक्ष देवाधिदेव महादेव सुध्दा या रामनामाचाच अखंड जप करीत असतो. म्हणूनच माणसाने स्वतःच्या उध्दाराकरीता रामनामाचा जप अखंड करीत रहावा असा उपदेश समर्थ करीत आहेत. एकदा का त्या श्रीरामाचा ध्यास मनात उत्पन्न झाला म्हणजे माणूस निःष्काम होतो. म्हणजेच माणूस कामरहित होता. आणि त्या राघवाचे ठायी तल्लीन होतो. तू मी असा भेदभाव रहात नाही. मराणूस परमेश्वाराशी एकाकार होतो. त्या परमेश्वरातच विलीन होतो. जेवतानाही त्या परमेशवाराचे चिंतन करीत अन्न जेवावे.

'जनी भोजनी नाम वाचे वदावे। अति आदेरे गद्यघोष म्हणावे। हरी चिंतन अन्न जेवीत जावे। तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे।'[2] या साध्या श्लोकांतुनही समर्थांनी सर्वसामान्य लोकांना केवढी उदात्त शिकवण दिली आहे. जर ईश्वराचे नामःस्मरण करीता अन्न सेवन केले तर त्या पासून पवित्र विचार उत्पन्न होतात. पवित्र अन्न आणि सुविचार हे जणू एक कोष्टकच आहे.

मनाच्या दोनशे पाच श्लोकांतून समर्थांनी सर्वसामान्य लोकांना अतिशय सुंदर अशी शिकवण दिली आहे. ही शिकवण नुसत्या व्यक्तिपुरतीच मर्यादित नसुन ती अखिलमानवजातीसाठी आहे. या श्लोकातून गहन अध्यात्मतत्वे अतिशय सोप्या भाषेतून माणसांना सहज समजतील इतक्या सुलभ

रीतीने त्यांनी समजावून सांगितली आहेत. या मनाच्या श्लोकातून रामदासानी दिलेली शिकवण ही अतिशय अजोड तशीच ती अतूलनीय आहे.

समर्थांची शिकवण ही त्यांच्या ग्रंथसंपत्तीत भरून राहिली. आहे. त्यानी सर्वसाधारण माणसाला रोजच्या व्यवहारात पदोपदी उपयोगी पडेल अशी शिकवण आपल्या ग्रंथातून वेळोवेळी दिली आहे त्यांनी दिलेली परमार्थिक शिकवण ही सर्वांना माहिती आहेच, त्यांनी दिलेली व्यावहारी शिकवण सुध्दा महत्वाची आहे. रामदासांना संपूर्ण समाजाला योग्य दिशेने घेऊन जायचे असल्याकारणाने त्यांनी प्रपंचाबरोबर परमार्थ सुध्दा सांगितला. परमार्थाबरोबरचते व्यवहाराला सुध्दा महत्व देतात. रामदासांच्या मते ज्या माणसाला प्रपंच नीट करता येत नाही. तो माणूस परमार्थही नीट करू शकत नाही. प्रपंचात राहून परमार्थ कसा करावा याचा उपदेश समर्थांनी सर्वसामान्य माणसांसाठी केला असल्यामुळे त्यांनी केलेला व्यावाहारीक उपदेशही सर्वसामान्यांसाठी महत्वाचा आहे. समर्थांचे निरक्षण सूक्ष्म असल्यामुळे व चालावे कसे, बोलावे कसे, बसावे कसे इथपासून ते राजकारण कसे करावे इतपर्यंत सर्वच क्षेत्रात त्यांच्या उपदेश आजही लागू होण्या सारखा आहे.

रामदासांनी दासबोधातील दुस–या दशकाची सुरूवात 'मूर्खांची लक्षणे' सांगून केली आहे. ती लक्षणे वाचताना हयातिल काही लक्षणे आपल्यातही आहेत असे माणसाला वाटायला लागते. म्हणून ती लक्षणे वाचून माणसाने कसे वागायचे हे ठरवायचे असते. ती लक्षणे वाचून आत्मसात न करता त्याने ती त्यागायची असतात. रोजच्या जीवनातील साध्या साध्या गोष्टीच परंतू त्या व्यवहाराच्या दृष्टीने किती महत्वाचे असतात ते या समासात पाहवयास सापडते. समर्थांनी माणसाने सकाळी लवकर उठावे काहीतरी वाचावे, त्याचे मनन करावे, म्हणजेच माणूस सकाळी उठल्यापासून त्याची दिनचर्याच समर्थांनी सांगून ठेवली आहे. आपल्या व्यवहार–धंदा संसार खबरदारीने सांभाळूण चोख करावा ही समर्थांची शिकवण वैशिष्टयपूर्ण आहे. प्रपंच व्यवस्थित होण्याकरीता समर्थांनी उत्तम पुरूषाची लक्षणेही सांगितली आहेत. त्यांनी सांगितलेली उत्तम पूरूषाची लक्षणे जरसंसारी माणसाने आत्मासात केली तर तो सदैव सुखाच्या साम्राज्यावर आरूढ होईल. संसारी माणसाला असे वाटत असते की मी शहाणा, मी म्हणतो. तसेच व्हावे पण तसे घडत नाही. त्यामुळे तो दुःखी होतो. व नशिबाला दूषणे देत राहतो. हा अनुभव व्यवहारात सदोदित येत असतो. असे घडू नये म्हणून समर्थ माणसाला विचाराने वागायला सांगतात.

माणसाने बोलताना परमेश्वर हा सगळीकडे भरून उरला आहे. त्याच्याजवळ भेदभाव नाही. असे म्हणत असतो. पण व्यवहारात मात्र तो निरनिराळया देवतांची उपासना करतो. आपण ज्या देवांची उपासना करतो तोच देव सर्वश्रेष्ठ असे मानतो. परंतू ही समजूत चूक आहे, हे समर्थ परोपरीने समजावून सांगत असतात. पानांच्या, फंलांच्या आणि मण्यांच्या माळा ओवलेला दोरा जरी

एक असला आणि त्या पानात, फुलात व मण्यात चिरंतन वास करणारी वस्तू जरी एक असली, तरी व्यवहारीक दृष्टिने पाहू गेल्यास पान, फूल व मणी यात भेद आहे. सगळयामाणसांत वास करणारा आत्मा जरी एक असला तरी चांगला माणूस आणि वाईट माणूस हे दोन्ही एक होत नाहीत. म्हणजेच सृष्टीत भेद हे मूळातच आहेत. समाजाला प्राप्त होणा–या अनावस्थेचे मूळ शोधून काढून त्याला विचारांची नीट बैठक देवून उत्साहवर्धक अशा प्रेरणेने त्याला कार्यशील बनविण्याचे समर्थांचे कसब अजब आहे.[3] समर्थांनी सांगितलेली चातुर्याची लक्षणे समाजात वावरत असताना प्रत्येकाने आचरणात आणावीत. दुस–याचे मन आपल्याकडे कसे आकृष्ट होईल याबद्दल त्यांनी केलेला उपदेश प्रत्येकाने आपल्या आचरणात आणावा असाच आहे. समर्थ म्हणतात, " एकाला मागूल मिळत नाही व एकाला न मागताच मिळते याचे कारण लक्षात घ्यावयात हवे." दुस–याचे मनावर प्रभुत्व मिळविण्यासाठी माणसे वशीकरण सारखे उपाय करतात. त्यांनी केलेले उपाय सफल होतातच असे नाही. मन हे संकूचित असल्यामुळे ते जागोजागी लटके पडते. मग ते उपाय करणा–या माणसाच्या वाटयाला कार्यसिध्दीचे सूख येत नाही. आपल्या पूर्व सुकृतानुसार माणूस कुकर्म किंवा सत्कर्म करीत असतो. प्रत्येकाने विवेकाने दुस–याची खरी किंमत करावयास हवी, आपले तेवढे खरे दुस–याचे कितीही चांगले किंवा खरे असेल तरी ते असत्य समजल्यामुळे आपल्या भोवती लोकजमा होणार नाहीत. समाजात वावरत असताना माणसाच्या अंगी चातुर्य हा गुण असावा. ज्ञानाच्या व प्रयत्नांच्या जोरावर माणूस कोणतेही कार्य करू शकतो. पूर्वजांच्या पूण्यावर किंवा नशीबावर हवाला ठेवून माणसाचे कुठलेच कार्य यशस्वी होत नाही. नशीब हे माणसाच्या हातात असते ते ज्याचे त्याने घडवायचे असते. सगळयांचे म्हणणे ऐकून घेऊन माणसाने आपल्या अनुभानुसार व ज्ञानाच्या सहा ने आपला मार्ग शोधायचा असतो. या समाजात वावरत असताना सावधपणे वावरायला हवे कारण आपल्या संपर्कात येणारे लोक निरनिराळया स्वभावाचे असताना, कधी पड खाऊन तर कधी हात मिळवणी करून आपला कार्यभाग साधून घ्यावयास हवा. दुस–याच्या मताप्रमाणे वागून त्याचे मन आपल्याकडे वळवावे व नंतर त्याला कधी समजावून सांगून तर कधी उपदेश करून त्याच्या आचार व विचारत बदल घडवून आणावयास हवा. हट्टी माणसाशी गोड बोलून त्याला आपलेसे करून घेत आले पाहिजे. अशाप्रकारे समाजात चतुरपणे वागून कार्यकर्त्यांनी लोकसंग्रह करावा या विषयी समर्थ रामदासांनी अतिशय उत्कृष्ठ मार्गदर्शन केले आहे. जर माणसाला ज्ञानप्राप्ती झाली तर तो प्रपंच परमार्थ या दोन्ही गोष्टी नीट साध्य करू शकेल समर्थांनी विवेक माणसाची लक्षणे सांगितले आहेत. ती प्रत्येकाने अंगी बाणवून घेणे आवश्यक आहे.

त्यानी दिलेली व्यावहारिक शिकवण ही अतिशय बोधप्रद आहे. व्यवस्थित माणसाने संसारी माणसाने संसार कसा करावा, प्रपंच व्यवस्थित होण्यासाठी कोणते गुण अंगी बाणले पाहिजेत व कोणत्या गुणांचात्याग केला पाहिजे. हे रामदासांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

*****

## रामदासांची शैली

समर्थांचे वाड्.मय रचनेच्या दृष्टीने छंदोबद्ध असले तरी शैली आणि आशय या दृष्टीने ते गद्यप्राय आहे. समर्थांच्या स्वभावाला भाषेचा हळुवारपणा, आशयाचा रसाळपणा आणि रचनेची कोवळीक जणूं मानवत नसावी. परंतु समर्थ वाड्.मयाचे सार असलेले 'मनोबोध' प्रकरण मात्र रसाळपणाच्या दृष्टीनेही सरस आहे.

'मनोबोध' या नावाने ओळखले जाणारे 'मनाचे श्लोक' समर्थांच्या ओजस्वी, अस्खलित आणि स्फूर्तीप्रद शैलीमुळे आणि जीवनाला अर्थ प्राप्त करुन देणा–या आशयामुळे बहुसंख्य लोकांच्या पाठांतरात असलेले आजही दिसून येतात. यातील एक जरी श्लोक कानावर पडला तरी मरगळलेल्या मनाला उभारी प्राप्त व्हावी, आपल्या दोषांची जाणीव व्हावी आणि आपले मन अंतर्मुख व्हावे, ह्या
वास्तव ज्ञान होऊन त्यातून पार पाडण्यासाठी
श्लोकामुळे जगरहाटीचे संजीवक संदेश प्राप्त व्हावेत असे सामर्थ्य या 'मनाच्या श्लोकांत' आहे. 'जगी सर्व सुखी असा कोण आहे। विचारी मना तूचि शोधून पाहे।', 'मना त्यांचि रे पूर्वसंचित केलें तयासारिखें भागणें प्राप्त झाले' अशा प्रकारे मनाला परोपरीने बोध करणा–या समर्थांच्या या वाणीला बरेच ठिकाणी सुभाषितांचे मोल प्राप्त झालेले आहे.

त्या वेळच्या हिंदूंच्या मनावर फकीर, पीर, अवलिये यांचाच प्रभाव अधिक पडलेला दिसून येतो. त्यांच्या फारसी, उर्दू व मराठी सवालांचा संस्कार खेडेगावात सकाळच्या वेळी त्यांच्या गायनातून होत असे, हे पाहून समर्थ रामदासांना 'मनाचे श्लोक' लिहिण्याची प्रेरणा झाली असावी. असे राजवाडे यांनी म्हटले आहे. ते म्हणतात, " शिवाय ह्यांच्या रचनेत एक ऐतिहासिक गूढ आहे. ते हे की, ह्या श्लोकांची वृत्तरचना मुसलमानी फकिरांच्या फारशी, उर्दू व मराठी सवालांच्या वृत्तरचनेसारखी हुबेहुब आहे..... दासांच्या वेळी मुसलमानी पीर व त्यांचे तकिये महाराष्ट्राच्या लहानशा खेडयातूनही अती झाले होते आणि आज जो सामान्य जनसमूह तो ह्या पीरांच्या, व फकीरांच्या मायावी कचाटीत इतका सापडला होता की, समर्थांना व शिवाजी महाराजांना त्याला मुक्त करण्यास नाना प्रकारचे लहानथोर उपाय योजावे लागले. त्यापैकी फकीरांच्या सवालांच्या अनुकरणाने सुचविलेला हा वृत्तरचनेचा लहानसा परंतु मोठा गुणकारी उपाय होता.रामदासी श्लोक व फकिर सवाल एकसमयावच्छेदाने ऐकूण गावोगावच्या मार्मीक लोंकाना पाच्छाई धर्माची परीक्षा करण्यास

केवढी सवड झाली असेल ते सांगावयास नकोच."[5]

'मनाच्या श्लोकां'प्रमाणेच करुणास्तोत्राचीही रचना मनाला जाऊन भिडणारी व अतिशय परिणामकारक आहे. दोन्ही रचनांचे स्थळ, काळ व परिस्थिती वेगवेगळी असल्यामुळे त्यातील आशयही भिन्न आहे. 'मनाच्या श्लोकां'ची रचना जनमान्यांना उपदेश करण्याचे व्रत स्वीकारल्यावर त्यांच्या मनाला उपदेश करून आधार देण्यासाठी केलेली आहे. स्वतःच्या मनाला समजावत असताना इतर जनसामान्यांच्या मनाला वाट दाखविण्याचे काम रामदासांनी कळत नकळत अंगिकारले होते. मनाच्या श्लांकांमध्ये एक आश्वासन आहे, आत्मप्रत्ययाचे भान आहे. मनाचे श्लोक हे ऐहिक आणि पारलैकिक जीवन या दोन्हीच्या सीमेरेषेवर वावरणारेआहे. साधक आणि उपदेशक या दोन्ही भूमिका रामदासांनी एकाच वेळी स्विकारल्या सारख्या आहेत. या दोन्ही भूमिका एकमेकांत इतक्या मिसळून गेल्या आहेत की एकमेकीच्यातून एखादी वेगळी काढताच येणार नाही अशा दुहेरी भूमिकेतून लिहलेल्या या श्लोकांचा समर्थांच्या शिष्यावर विशेष उपयोग झालेला दिसतो. भिक्षेवर आपली उपजीवीका आपल्या शिष्यांनी चालवावी असा समर्थांचा दंडक होता. ही भिक्षा मागत असताना कोणाच्याही घरासमोर उभे राहून एखादा मनाचा श्लोक मोठया आवाजात म्हणवा व पुढे जय जय रघुवीर समर्थ'असे म्हणून दिलेली भिक्षा घेऊन पुढे जावे. असा समर्थांचा शिष्यांनाआदेश होता.

मनाच्या श्लोकांचा अर्थ आजपर्यंत बरेच जणांनी आपापल्या कुवती प्रमाणे लावण्याचा प्रयत्न केला आहे. मनाचे श्लोक हे म्हणायला सोपे, साधे, सरळ असुनही त्यातून समर्थांनी लोकांना उपदेश केला आहे. हे श्लोक अज्ञ व तज्ज्ञ अशा दोघांसाठीही आहेत. हे श्लोक सुगम असल्यामुळे ऐकणा–याच्या ह्यदयाला जाऊन ते सरळ भिडतात. या श्लोकांत परस्पर संगती असल्या कारणाने त्याचा प्रवाहही अखंड वाहतो. व्याकरणाच्या चौकटीतून पाहू गेल्यास या श्लोकात छंददोष आणि भाषादोष पुष्कळच आहेत. परंतू नियमांनी नियमीत व्हावे असे रामदासी भाषेचे स्वरूप नाही.[6] समर्थांची आ र्षवाणी मनोबोधात उत्स्फूर्ततेने प्रगट होत. असल्यामुळे ती यमनियम वगैरे काहीही जाणत नाही. त्या वाणीच्या अखंड, धीरगंभिर प्रवाहात श्रोत्यांचे मन आपसूकच वाहत जाते, आणि त्या वाणीच्या बाह्यांगाचा श्रोत्यांना विसर पडतो. मनाच्या श्लोकांतील भाषा विचारांना आणि आणि विचार भाषेला पोषक असल्याने तीनशे साडेतीनशे वर्षे होऊन ही ह्या श्लोकांना महाराष्ट्रतील घराघरातून मानाचे स्थान मिळाले आहे. यातील चार दोन श्लोक पाठ येत नाहीत असा मनुष्य महाराष्ट्रात सापडणे कठीणच. मनाच्या श्लोकांनी मनाशी बोलायला व त्या राघवाचा पंथ शोधायला

सर्वसामान्य लोकांना शिकविले. हे श्लोक म्हणायला सोपे, ऐकायला मधुर, मनन करायला लावणारे व मनन करताना शांती व सुख देणारे असे आहेत. समर्थांच्या ह्या मनाच्या श्लोकांत साधपणा, सहजपणा, ओज व प्रसाद भरुन राहिला आहे. उपासनेची ज्ञानाशीं मिठी पडल्याचा जो अनिर्वाच्य स्वसुखानुभव यांत व्यक्त झाला आहे. त्यामुळे ह्या श्लोकांना अवीटपणा आला आहे. अनुभवाची वाणी प्रासदिक आणि अवीट असते. ती पुनःपुनः गुणगुणत रहावी असे वाटते व त्यानुळे लोक तिच्याकडे मोहित होतात. मनाचे श्लोक ही रामदासांची अपौरुषेय वाणी आहे. हे श्लोक एका उस्फूर्त, उत्कट भावनेतून जन्माला आलेले आहेत. लोकांचा उद्धार करण्याच्या प्रेरणेतून हे श्लोक निर्माण झालेले असून ती एक सृजनशील साहित्यनिर्मिती आहे. स्वराज्यपूर्व काळातील लोकसंघटनेच्या स्वरुपाचे विशिष्ट सामाजिक – राजकीय प्रश्न काही अंशी मार्गी लागल्यानंतर मानवी जीवनातील मुलभूत, मध्यवर्ती आणि मौलिक महत्वाच्या प्रश्नांकडे लोकांचे लक्ष पुन्हा वेधण्यासाठी, लोकांच्या जीवनातील अंतिम मूल्यांविषयी प्रभावीपणे उद्‌बोधन करण्यासाठी मनाच्या श्लोकांची रचना झाली आहे. एका अनुभवसंपन्न प्रज्ञावंताच्या करुणार्द्र हृदयातून लोककल्याणासाठी स्फुरलेली ही अमृतवाणी आहे. म्हणूनच मनाच्या श्लोकांना स्थलकालातीत अशी वैश्विक प्रतिष्ठा लाभली आहे. [7]

मनोबोध हे फार सरस, आशयघन आणि बोधप्रद आहेत. या प्रकरणात समर्थ रामदास आपल्या पूर्व सामर्थ्यानिशी उभे राहिलेले आहेत. मनाच्या श्लोकांत समर्थांच्या भाषेची गद्यसदृशता आणि भाषाशैथिल्यही दिसून येते. समर्थांची भाषा व्याकरणाच्या परिक्षेला उतरतेच असे नाही. त्यांच्या भाषेत अनेक ठिकाणी व्याकरणदोष दिसतात. श्री वामनपंडीत, रघुनाथपंडीत, रामजोशी, प्रभाकर यांच्याही भाषा व्याकरणदृष्टया शिथिलच आहेत. मनोबोधातील भाषेत एक प्रकारचे उसळते चैतन्य आहे, ओज आहे, आवेश आहे, साक्षात्काराचे तेज आहे, जनहिताची तळमळ आहे, सर्वप्रकारच्या मार्गदर्शनाचा नेमकेणा आहे आणि म्हणूनच मनोबोध हे प्रकरण अतिशय मनोवेधक आणि प्रभावी झाले आहे.

संस्कृत भाषेतील अध्यात्म वाड्.मयात उपनिषदास जे अनन्य साधारण महत्व आहे तेच महत्व मराठी भाषेतील मनाच्या श्लोकास लाभले आहे. [9] हे सर्व श्लोक भुजंगप्रयात वृत्तामध्ये रचलेले आहेत. कारण हे वृत्त रचनेच्या दृष्टीने अतिशय सोपे असून ते सहज गाता येते. या श्लोकांची भाषा सुद्धा सुलभ असल्याकारणाने ते म्हणणाऱ्याच्या व ऐकणाऱ्याच्या हृदयाचा ठाव

घेते. श्लोकांमध्ये रचनेच्या दृष्टीने दोष नाहीत. पण काही श्लोकांमध्ये छंदोभंग, –हस्वाचे दीर्घ, दीर्घाचे –हस्व, अशुद्ध शब्द इ. दोष नजरेस येतात. विषय स्पष्ट करत असताना समर्थांची प्रेरणा इतकी प्रभावीपणे प्रगट होते की ती व्याकरणदृष्टया शुद्ध शब्दासाठी अडून रहात नाही. त्याचप्रमाणे त्यांची जनकल्याणांची तळतळ इतकी प्रकर्षाने प्रगट होते की तिच्यातून खळाळत्या झ–याप्रमाणे त्यांची भाषा प्रासंदिक, तेजस्वी, खणखणीत आणि अर्थपूर्ण होऊन वाहू लागते. मनोबोधातील येणा–या प्रत्येक श्लोकांत सुंदर विचारांची माला गुंफली असल्यामुळे ते श्लोक म्हणत असताना त्यात असणा–या दोषांकडे फारसे लक्ष जात नाही. रामदास हे जातिवंत शिक्षक असल्याकारणाने स्थळ, काळ, वेळ, श्रोते आणि प्रसंग लक्षात घेऊन ते विषयाची मांडणी करीत असताना त्यातील मूलभूत तत्व ते न विसरता पुन्हापुन्हः सांगताना आढळतात. संपूर्ण जीवनदर्शन समर्थ अत्यंत साध्या व सोप्या पद्धतीने मनाच्या श्लोकाच्या संदर्भात त्र्यं. शं. शेजवलकर लिहितात, "रामदासांनी पंथाची प्रणाली तत्कालीन मुसलमान धर्मप्रसारकांच्या पद्धतीत शोभून दिसेल. दासांच्या मनाच्या श्लोकांची धाटणी व वृत्त मुसलमान फकीरांच्या म्हणण्याशी जुळतात, हे राजवाडयांनी आपल्या रामदासांवरील निबंधात दाखवून दिले आहे. फकीरांचे सवाल आणि दासांचे मनाचे श्लोक यात फक्त शेवटच्या गुरु अक्षराचा भेद आहे. सवालाचे शेवटचे अक्षर श्लोकाप्रमाणे दीर्घ असले तरी त्यात य गण पूर्ण होत नाही.

मनाच्या श्लोकांच्या वृत्तरचनेसंबंधी डॉ. उषा जोशी लिहितात, "समर्थांच्या वृत्तरचनेचे कौशल्य हे श्रेष्ठ दर्जाचे होते हे प्रगट होते, ते या श्लोक रचनेतून ! या रचेनतील दोषांचे प्रमाण लक्षात घेता ते अल्पच म्हणावे लागेल."

साडेतीनशे वर्षे होऊनही 'मनाचे श्लोक' आजही तितक्याच आत्मियतेने जनमानसाकडून स्विकारले जातात, याचे श्रेय त्याची वृत्तरचना आणि ते श्लोक म्हणण्याची पद्धती याहीकडे जाते. मनाच्या श्लोकांत समर्थांनी कर्म, ज्ञान आणि उपासना यांचा अत्यंत सोप्या पण परिणामकारक भाषेत परिचय करुन दिला आहे.

रामदासांनी मनोबोधाची रचना केल्यावर त्यांना कोणी एकाने प्रश्न केला की तुमचा अधिकार उपदेश करण्याचा असूनही तुम्ही लोकांना उद्देशून 'मनोबोधा' ची रचना का केली नाही ? तुम्ही स्वतःच्याच मनाला उपदेश का केला ? त्यावर रामदासांनी अत्यंत नम्रतेने उत्तर दिले –

म्हणे दास, लोकांस मी काय सांगो ?

तराया जनीं मीचि कासेसि लागों.

बरीं साक्षपें औषधें वाढवावी.

जया लागला रोग तेणेंचि घ्यावी ।

त्यांच्याजवळ जराही आत्मप्रौढी नव्हती. ते म्हणतात, "मीच रामाची भक्ती करुन या मृत्यूलोकांतून कसे तरुन जायचे, या विवंचनेत आहे. तर मी लोकांना काय सांगू ? तरी सुद्धा अवती भोवती वावरणा–या जनसमुदायास हात देण्यास मी कमी पडणार नाही." रामदासांचे लोकांविषयी असणारे प्रेम विलक्षण होते. त्यांनी केलेला अभ्यास अतिशय सूक्ष्म होता. लोकांना चुचकारावे कसे, फटकारावे कसे, भरवावे कसे हे त्यांनी अभ्यासले होते. त्यांच्या समग्र वाङ्.मयात मानवी मनाचे मंथन आणि विश्लेषण निरनिराळया संदभर्सत केलेले आढळते. स्वतःचे अनुभव प्रयोगशाळेतल्या निष्कर्षाप्रमाणे मार्गदर्शक ठेवून जनसामान्यांच्या वाणीकरणाची चिकित्सा करीत निघालेला रामदास हा एक थोर मनोवैद्य होतो.

रामदासांच्या अथपासून इतिपर्यंत सर्व रचनेंत नियमबंधन नाही, शुद्धलेखनाचा धाक नाही, संस्कृतची जरबही नाही. जसा कवि, तशी त्याची भाषा, तीत भाडभीड नाही. तो जे मनात येईल तसे बोलतो आणि जसे बोलतो तसे लिहितो. असे वि. ल. भावे यांनी आपला 'महाराष्ट्र सारस्वत' या पुस्तकात दिले आहे. [11]

रामदासांनी रचलेल्या मनाच्या श्लोकांची परस्पर संगती ही स्वतः सिद्ध आहे. हे श्लोक वाचणा–याच्या थेट हृदयाला जावून भिडतात. तसेच ते स्फूर्तीदायक, प्रोत्साहक आणि धीर देणारे असे आहेत. शिष्याला आपल्या विश्वासात घेवून व आपला भरवसा घेवून आपला भरवसा त्यास देवून श्री समर्थ आत्मप्रत्ययाने बोलत असल्यामुळें वाचकांच्या वृत्ति आपसूकच तल्लीन होतात. त्यांच्या काव्यातरसांचा उत्कट परिपोष झालेला व ध्वनिचा ठिकठिकाणी अविष्कार झालेला नजरेस येतो. रामदासांची भाषाशैली ही जोरदार, ओजस्वी व समर्पक अशी आहे. जोरदार भाषा हे समर्थांचे वैशिष्टय आहे. त्यांची शब्दसंपत्ती अमोघ व अपार आहे. मराठी वाङ्.मयात इतके मराठी वळणाचें शब्दवैचित्र्य इतरांच्या ठिकाणी फारच क्वचित पहावयास मिळते. याशिवाय रामदासांची अनुभव सिद्धता, संसारिक उदाहरणे देण्याची हातोटी, व्युत्पन्नता व कार्यप्रेरकता ही अपूर्व व लोकोत्तर आहेत. मनाचे श्लोक हे साधकाला सरळ सज्जनसंगतीशी जोडतात. रामदासांच्या ठिकाणी असलेला पोटात शिरुन बोलण्याचा कोमल जिव्हाळा या श्लोकांत भरुन वाहतो. मनाची दुर्बलता

कशात आहे व समर्थता कशात आहे ते हेरावे, मनाचे दुबळेपण घालवावे कसे, अंगी असलेले सामर्थ्य कसे कारणी लावावे याचे हळूवार विवरण त्यात येते. प्रियेचा अनुयय करावा तशी मनधरणीची सुरेल भाषा या श्लोकांत सर्वत्र तरळत राहते. मनाच्या श्लोकांच्या रचनेत लाघवी वचनमाधुर्य आहे. जागरणाची व सांत्वनाची शक्ती आहे. त्यांच्या आळवणीला धीरोदत्त आर्तता आहे. उपदेशकाची भूमिका असूनही आढयता नाही. किंवा इतरांना तुच्छ लेखण्याचा खटाटोपही नाही. हिडिसफिडिसपणाचा लेशही नाही. सर्व जाणत्याचे बोलणे पाल्हाळ न लावता ठाशीव कसे होते याचा सुंदर नमुना या श्लोकांत आढळतो. मार्दव, ऋजूता आणि प्रासाद यांचे ओळीओळींतून नर्तन चालते.[11] समर्थांच्या बहुतेक वाड्.मयात दृष्टांतामागील स्वतंत्र प्रज्ञा, भावनेची उत्कटता व व्यापकता हे गुण अनुभवास येतात. त्यांच्या कवितेत ठिकठिकाणी विचाराचा भव्यपणा आणि रचनेचा सरळपणा यांचा सुंदर संगम पहावयास सापडतो.

एखाद्या विषयाचे विवेचन करता करता त्या विवेचनाचा सारांश लहानशा सुभाषितांसारख्या वाक्यात सांगण्याची कुशलता रामदासांच्या अंगी आहे. त्यांनी आपल्या भाषेत संस्कृत किंवा परदेशी शब्द वापरण्यास अटकाव केलेला नाही. परदेशी शब्द वापरल्याने आपली भाषा विटाळते असा त्यांचा अजिबात ग्रह नव्हता. त्यांच्या आधी एकनाथांनी आपल्या ग्रंथात मुसलमानी शब्द वापरुन एकप्रकारे त्या शब्दांचा स्विकार करण्याचा धडाच घालून दिला आहे. आपण केलेला उपदेश हा लोकांना सहज समजण्यासाठी त्यांनी लोकांच्या परिचयाचे शब्द आपल्याला सहज जसे सुचले तसे त्यांनी ते वापरले. आपल्याला जे शब्द सुचतील, स्फुरतील त्यांचा उपयोग करायचा ही सरळ दृष्टी समर्थांची असलेली दिसून येते. समर्थांच्या ज्ञानभांडारात समर्थांना हिंदी व हिंदूस्थानी भाषेचा उत्तम परिचय असल्याने त्यांनी एकनाथ व तुकाराम यांच्या तुलनेने अधिक मुस्लिम शब्द बेधडकपणे वापरले आहेत. उदा. गप, गुमान, जर, मस्त, बाजार, रुबरु वगैरे पुष्कळच शब्द वापरले आहेत. समर्थांच्या भाषेचा आणखी एक उल्लेखनीय विशेष म्हणजे त्यांनी निर्माण केलेले काही वाक्प्रचार व नवे शब्द होय. उदा. राजकारण या शब्दाचा दासबोधात त्यांनी घेतलेला अर्थ पॉलिटिक्स असा नाही, परंतू आज तो त्या अर्थाने रुढ झालेला आहे. मराठी भाषेला समर्थांच्या वाड्.मयातून या शब्दांची जणू देणगीच मिळाली आहे. कै. लोक. टिळकांचे गीतारहस्य बारकाईने पाहिल्यास त्यांनी तेथे उपयोगात आणलेले कित्येक शब्द मुळात समर्थांचे आहेत, असे लक्षात येईल. उदा. 'विश्वाची उभारणी आणि संहारणी' समर्थ 'उभार संहार' असेही शब्द योजतात, ब्रह्माचा 'एकजिनसी' पणा व मायेचा 'बहुजिनसी' पणा या शब्दाचे मूळस्थान दासबोधात आहे.

कुठल्याही विषयाची तपशीलवार नोंद करणे हे रामदासांच्या कवितेचे खास वैशिष्टय आहे. याची उदाहरणे दासबोधात जागोजागी सापडतात. नातेवाईक हे माणसां भोवती केवळ 'मायेपोटी' जमा होतात, त्यांच्यापासून खरे असे काहीच सुख मिळत नाही, हा रामदासांचा व्यावहारिक उपदेश आहे. हा उपदेश करताना अर्थस्तरावर किंवा रचनेतही काहीही चमत्कृती नाही. 'मुलांना शिकवण' या काव्यात ते नकारयुक्त असे आधी सांगतात. उदा. आळस नसावा, भांडण करु नये असे व पुढे त्यांनी सरळपणाने कसे वागावे हे सांगितले आहे. उदा. खरे बोलावे, न्यायपणाने वागावे वगैरे, जे आपल्यापेक्षा मोठे आहेत श्रेष्ठ आहेत त्यांचे दास्य पत्करावे, मोठयांचे ऐकावे, प्रचीती घ्यावी असा व्यावहारिक सल्लाही दिला आहे. असाच सल्ला त्यांनी मनोबोधातील श्लोकातही दिला आहे. आपली वर्तणूक कशी असावी याचाही त्यांनी उहापोह केला आहे. अर्थस्तरावर त्या श्लोकात पुन्हा व्यावहारिक सल्ला व नीतीपाठ एवढेच उरते.मनोबोधातील कितीतरी ओळी मराठीत सुभाषितांसारख्या प्रचलित आहेत. पद्यमय नीती उपदेश आणि त्या स्वरुपाचे लेखन मराठी समाजाने फार पूर्वीपासून काव्य म्हणून स्विकारले आहे. सुभाषितवाणीयुक्त शैली संत व पंडित ह्या दोघांनीही आपल्या काव्यात वापरली असून ती त्यानंतर कथा, नाटक, कादंबरी ह्या वाङ्.मयीन प्रकारातही स्विकारली गेली आहे. रामदासांच्या कवितेचा हा शैलिविशेष मराठी अभिरुचीचा एक भाग आहे. सिणावे, सांडणे या – आव प्रत्यययुक्त विद्यर्थातील क्रियापदांचा वापर, रे या संबोधनार्थी या शब्दाचा वापर ही रामदासांच्या कवितेची शब्दस्तरांवरची वैशिष्टये आहेत.

रामदासांची रचना ही भूजंगप्रयात, मालिनी, यासारख्या अक्षरगणवृत्तात केलेली आहे. अनुप्रासयुक्त शब्दांचा वापर हाही त्यांच्या रचनेचा एक विशेष आहे. त्यांच्या वाक्यरचनेत साधा वर्तमानकाळ, साधा भूतकाळ आणि विद्यर्थ यांचा वापर सर्वत्र झालेला दिसतो. त्यांची शब्दरचना ही सरळ आहे तिच्यात होणारा क्वचित बदल हा वृत्तासाठी असतो. व्यवहारातील सावधानता जपणारे आणि किळसवाण्या देहाचा होणारा ओंगळवाणा अंत भक्तीच्या उपायाने टाळू पाहणारे मन हे विशेषतः विचारवंताचे मन आहे. वैचारिक चौकटीच्या पलीकडे तरलपणे जाणवणारे जीवन आणि त्याचे अर्थ हे रामदासांच्या कवितेत दिसत नाहीत. भाषेची ध्वनिगम्य चमक आणि शब्दांची ठाशीव मांडणी ऐवढेच रूपस्तरावरचे शैलीविशेष वर्णन दिसते. तर वैचारिक चोकट बाजूला ठेवून काव्यमयतेकडे झुकण्यापेक्षा व्यावहरिक सूक्ष्म अवलोकनात ही त्यांची शैली विश्रांत पावते.

रामदासांची कविता वाचताना त्यांच्या भाषेवरून एक गोष्ट नजरेसमोर येते, ती म्हणजे ही कविता नाही. भाषेतच रस घ्यायला लावण्याचे सामर्थ्य त्यांच्या रचनेत नाही. विचार संप्रेषण ही तिची मुख्य कार्ये आहेत. त्यांची भाषा स्वतः भोवती रूंजी घालत नाही तर ती विचाराकडे नेते, व्यवहार कसा करावा हे शिकवते. सुभाषितात विचारालाच प्राधान्य असते, त्यातील शब्दाला नसते. रामदासांच्या कवितेत भाषा हे अध्यात्मविचाराचे जीवनातील वास्तवाचे एक माध्यम बनते.

*****

# * संदर्भ - सूची *




1. भा. शं. कांबळे, 'समर्थ प्रबोध', भारतीय विचार साधना, नागपूर पान नं. 7.

2. तत्रैव -- पान नंबर 26.

3. तत्रैव – पान नंबर 105.

4. अ. दा. आठवले – मनोबोध विवरण, पाचवी आवृत्ती, श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे, 11 जून 1996, पान नंबर 1.

5. र. रा. गोसावी – श्रीसमर्थ आणि समर्थसंप्रदाय, पहिली आवृत्ती, व्हीनस प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1981, पान नंबर – 201.

6. शं. गो. तुळपुळे – पांच संतकवी, तिसरी आवृत्ती, सुविचार प्रकाशन, मंडळ, पुणे, मार्च 1984, पान नंबर 424.

7. श्या. गो. मुद्‌गल, श्री. र. कावळे, अनिरुद्ध कुलकर्णी, संपादित समर्थ दर्शन, प्रथम आवृत्ती, (प्राचार्य दांडेकर धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक वाड्.मय प्रकाशन मंडळ) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1982, पान नंबर – 22.

8. अ. दा. आठवले – मनोबोध विवरण, पाचवी आवृत्ती, श्रीराधादामोदर प्रतिष्ठान, पुणे, 11 जून 1996, पान नंबर – 2.

9. के. वि. बेलसरे – सार्थ मनाचे श्लोक, पुर्नमुद्रण, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड – सातारा, 1996, प्रस्तावना पान नंबर = 2.

10. 'त्र्यं वि. सरदेशमुख – रामदास प्रतिमा आणि प्रबोध, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट 1984, अस्मिता प्रकाशन, पुणे, पान नंबर 103.

11. वि. ल. भावे – महाराष्ट्र सारस्वत, पांचवी आवृत्ती, 1993 पान नंबर – 331.

12. त्र्यं वि. सरदेशमुख – रामदास प्रतिमा आणि प्रबोध, प्रथम आवृत्ती, अस्मिता प्रकाशन, पुणे, ऑगस्ट 1984, पान नंबर 103.

13. न. र. फाटक – रामदास वाड्.मय आणि कार्य, दुसरी आवृत्ती, मौज प्रकाशन गृह, मुंबई – 4, जानेवारी 1970, पान नंबर 309.


*****